RNI No. MAHBIL/2009/35529

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक २२] गुरुवार ते बुधवार, जून ३-९, २०२१/ज्येष्ठ १३-१९, शके १९४३ [पृष्ठे १५ किंमत : रुपये १४.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

अधिसूचना

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी यांजकडून
(उप चिटणीस शाखा)

वाचले :— (१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०.

(२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४.

(४) महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक २३,२४, २५ मार्च, २०२०.

(५) महाराष्ट्र शासनाकडील स्पष्टीकरण No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ०३ एप्रिल, २०२०.

(६) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक १७, १८, २१ व ३० एप्रिल, २०२०.

(७) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ०२, ०३, १९, ३१ मे, २०२०.

(८) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ०४, २५, २९ जून, २०२०.

(९) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक ०६, ०७, २९ जुलै व ३१ ऑगस्ट, २०२०, दिनांक ३० सप्टेंबर, २०२०, दिनांक १४, २३ ऑक्टोबर, २०२०, दिनांक ०३, १४, २७ नोव्हेंबर, २०२०, दिनांक २१ डिसेंबर, २०२०, दिनांक २९ जानेवारी २०२१, दिनांक २४ फेब्रुवारी २०२१, दिनांक १५, २७ मार्च २०२१, दिनांक ०४, ०५ एप्रिल २०२१.

(१०) या कार्यालयाकडील दिनांक ०६, १५, २४, ३० ऑक्टोबर, २०२०, दिनांक ०५, १६ नोव्हेंबर, २०२०, दिनांक ०१, ०७, २१ डिसेंबर, २०२०, दिनांक ०१, ०७, २२, २४ फेब्रुवारी २०२१, दिनांक ०१, १७, २७ मार्च २०२१ व दिनांक ०५ एप्रिल २०२१ रोजीचे आदेश.

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ प्रमाणे

आदेश

क्रमांक उचिशा/पोल-२/ज.बं.आ./१४४/२०२१.— ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा, १८९७, दिनांक १३ मार्च २०२० पासून लागु करून खंड २,३,४ मधील तरतुदींनूसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रत्नागिरी जिल्ह्यामध्ये नियंत्रणात ठेवण्याच्या हेतूने व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार रोखणे आणि त्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी या कार्यालयाकडील दिनांक ७ फेब्रुवारी, २०२१ अन्वये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये आदेश जारी करून त्यामध्ये सुधारणा करणेसाठी दिनांक २२, २४ फेब्रुवारी, २०२१ ते १७, २७ मार्च २०२१ अन्वये पुरवणी आदेश व शद्धीपत्रक जारी केले आहेत.

आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये या कार्यालयाकडून निर्गमित केलेल्या संदर्भ क्र. १० मधील दिनांक ७ फेब्रुवारी, २०२१ च्या आदेशाची मुदत दिनांक ७ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी ०९-५९ वाजता संपुष्टात आली आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४(४) मधील तरतूद विचारात घेता जिल्हादंडाधिकारी यांना कलम १४४(४) नुसार दोन महिन्यांच्या कालावधीपर्यंतच आदेश निर्गमित करण्याचे अधिकार आहेत.

तथापि, शासनाकडील आदेशांनुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम, २०२० ची अंमलबजावणी करणेसाठी ठोस उपाययोजना चालु ठेवणे आवश्यक आहे. सबब कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये नव्याने आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे, अशी माझी धारणा झाली आहे.

सबब मी, संजय शिंदे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी सदर आदेशाच्या दिनांकापासून ते पुढील आदेश होईपर्यंत (२ महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी किंवा सदर आदेश तत्पूर्वी मागे घेईपर्यंतच्या कालावधीसाठी) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड-१९, उपाययोजना नियम, २०२० ची अंमलबजावणी करणेसाठी ठोस उपाययोजना करणेचे दृष्टीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये या आदेशाद्वारे ५ किंवा ५ पेक्षा जास्त व्यक्तींना रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी एकत्रित येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचा अंमल रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक ७ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ११-०० वाजलेपासून ते पुढील आदेश होईपर्यंत (दोन महिन्यांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी किंवा सदर आदेश तत्पूर्वी मागे घेण्यात येतील अशा कालावधीपर्यंत) अंमलात राहील.

सदरचा आदेश आज दिनांक ७ एप्रिल २०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित केला आहे.

संजय शिंदे,

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ७ एप्रिल २०२१.

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी यांजकडून
(उपचिटणीस शाखा)

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ अन्वये मनाई आदेश

वाचले : (१) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५.

(२) पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांजकडील पत्र जा.क्र.जिविशा/कडवई म.आदेश/८७५/२०२१, दिनांक १६ मार्च २०२१.

आदेश

क्रमांक उचिशा/पोल-२/म.आ./कडवई/२०२१.— ज्याअर्थी, मौजे कडवई, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील वादग्रस्त स्मशानभूमी बाबत इकडील आदेश क्र.उचिशा/पोल-२/का.वि.५/म.आ./कडवई/२०२०, दिनांक ११ जानेवारी २०२१ अन्वये दिनांक ११ जानेवारी २०२१ ते दिनांक ११ मार्च २०२१ या कालावधीकरीता मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्यात आलेला होता ;

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी वाचले अ.क्र. २ ने वादग्रस्त स्मशानभूमीचा वाद अद्यापही मिटलेला नसल्याचे कळवून वादग्रस्त जागेकरिता मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे दिनांक ११ मार्च २०२१ रोजीपासून पुढे ६० दिवस, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्याची विनंती केली आहे.

त्याअर्थी, मी, अपर जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता मौजे कडवई, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील श्री. नजीर जुवळे यांचे घरासमोरील नदीचे पात्रात शासकीय जागेत ज्या ठिकाणी अंत्यविधी केला जातो त्या वादग्रस्त जागेत मृत देहांचे दहन करून, दफन करून किंवा अन्य तऱ्हेने त्यांची विल्हेवाट लावण्यास मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे दिनांक ०८ एप्रिल २०२१ ते दिनांक ०६ जून २०२१ पर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे. सबब मौजे कडवई येथील अधिकृत स्मशानभूमींपैकी वाणीवठार व कडवई बाजारपेठ येथील ग्रामस्थांनी ‘ देण ’ येथील स.नं. ५०२, हि.नं.१४ क्षेत्र ०.१६.० या जागेचा वापर प्रेतांचे अंत्यविधीसाठी करावा.

सदरहू आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत ईसम मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदर आदेश माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक ८ एप्रिल २०२१ रोजी दिला.

दत्ता भडकवाड,
अपर जिल्हादंडाधिकारी,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ८ एप्रिल २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./२१५४/२०२१.— श्री. अे. अे. पांडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांची दिनांक २३ मार्च २०२१ ते दिनांक २५ मार्च २०२१ अशी ३ दिवसांची परावर्तित रजा मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अे. अे. पांडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अे. अे. पांडे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. अे. अे. पांडे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. एस. सोनवलकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ६ एप्रिल २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./२१५५/२०२१.— श्रीमती एम. ए. के. शेख, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरूड यांची दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ९ एप्रिल २०२१ अशी एकूण ९ दिवसांची अर्जित रजा, दिनांक १ एप्रिल २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपासून ते दिनांक १० एप्रिल २०२१ रोजीच्या का. वे. पू. पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

श्रीमती एम. ए. के. शेख, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरूड येथे पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. ए. के. शेख, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मुरूड या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एम. ए. के. शेख, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एस. व्ही. घारगे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक १ एप्रिल २०२१.

BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

Read : (1) Application of Shri, B. R. Patil, Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad, requesting to grant him *ex-post-facto* earned leave for 3 days from 30th March 2021 to 1st April 2021 with permission to prefix holiday on 29th march 2021 and suffix holiday on 2nd April 2021 and permission to leave head quarters from 28th March 2021 A.O.H. to 3rd April 2021 B.O.H.

(2) Service Book of Shri. B. R. Patil, Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad, shows 134 days earned leave at his credit.

Office Order

No. Admn./938/2021.— Shri B. R. Patil, Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad, is granted earned leave *ex-post-facto*, for 3 days from 30th March 2021 to 1st April 2021 with permission to prefix holiday on 29th March 2021 & suffix holiday on 2nd April 2021 and permission to leave head quarters from 28th March 2021 A.O.H. to 3rd April 2021 B.O.H.

No *locum tenens* is necessary.

On return from leave Shri. B. R. Patil is reposted as Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S.(Pay) Rule, 1981, Shri. B. R. Patil, would have been continued to an officiate as Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad had he not proceeded on leave as above.

During the abovesaid leave period, the charge of the Court of the Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad from 28th March 2021 A.O.H. to 30th March 2021 B.O.H. was kept with Smt. D. K. Patil, Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Kankavli, from 30th March 2021 O.H. to 1st April 2021 A.O.H. was kept with Shri. S. A. Jamadar, Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Kankavli and from 1st April 2021 A.O.H. to 3rd April 2021 B.O.H. was kept with Smt. D. K. Patil, Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Kankavli.

The Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Deogad is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officer concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

District Court, Sindhudurg,
dated the 6th April 2021.

THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

Order

No. CP/XI(6)/144/(Prohibitory Order)/2021.— Whereas in exercise of powers, conferred under-section 2 of the Epidemic Disease Acts, 1897, read with all other enabling provisions of the National Disaster Management Act, 2005, the Government of Maharashtra, issued directions *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, dated 20th April, 2021 ("Break The Chain") to take certain emergency nieasures to prevent and contain the spread of COVID-19 virus, and to enforce these measures throughout the state from 8 PM on 20th April, 2021 till 7 AM on 1st May 2021.

2. Whereas, the undersigned issued an order u/s 188 CrPC, Dated: 14th April 2021, to observe the directions of the Government of Maharashtra *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated : 13th April 2021, to take certain measures to prevent and contain the spread of COVID-19 virus.

3. THEREFORE, I, Chaitanya. S., Dy. Commissioner of Police (Operations), Greater Mumbai, and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me u/sec 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) r/w the order of Commissioner of Police, Greater Mumbai, dated 23rd December 1959 u/s 10 sub-section (*2*) of the Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951), with a view to prevent danger to human life, health or safety, do hereby, promulgate an order under section 144 CrPC, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, to observe the directions of the Government of Maharashtra *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated : 20th April, 2021. By this order, I hereby prohibit all groceries, vegetables shops, fruit vendors, dairies, bakeries, confectionaries, all type of food shops (including chicken, mutton, poultry, fish and eggs), shops related to agricultural implements and farm produce, pet food shops, shops related to materials for impending rainy season for individuals as well as for organizations from opening, except between 7 AM to 11 AM only. Home delivery from the said shops however may be allowed between 7 AM to 8 PM and these timings however may be changed by the local authority. The local Disaster Management Authorities to include any additional entities/services as essential under section (2) of the order dated 13th April, 2021 only after the consent of the State Disaster Management Authority. All other conditions other than the ones specified in this order will be in accordance with the Government Order dated 13th April, 2021 and additions/clarifications already issued there of by the State Government.

4. This order shall come into force, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, with effect from 8 PM on 20th April 2021 and will remain in force till 7 AM on 1st May, 2021, unless withdrawn earlier.

5. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code, 1860 in addition to penal provisions under the Epidemic Diseases Act, 1897 and National Disaster Management Act, 2005 and other legal provisions as applicable.

6. As the notice cannot be served individually on all concerned, the order is hereby passed ex-parte. It shall be published for the information of the Public, through the Press, or by affixing copies on the Notice Boards of the Police Stations and offices of the Divisional ACsP and Zonal DCsP.

Given under my hand and seal on this 20th day of the April 2021 at Mumbai.

CHAITANYA. S.,
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

Greater Mumbai.

OFFICE OF THE COMMISSIONER OF POLICE, BRIHAN MUMBAI

Order

No. CP/XI(6)/L.W./702 (4)/2021.— Whereas, considering necessity for the preservation of public peace and public safety in Brihan Mumbai. I, Chaitanya. S., Dy. Commissioner of Police (Operations), Brihanmumbai in exercise of the powers conferred upon me under sub-section (*1*) and (*2*) of section 37 read with sub-section (*6*) of section 2 and sub-section (*2*) of section 10 of the Maharashtra Police Act (Mah. XXII of 1951) do hereby prohibit the following acts throughout Brihan Mumbai for the period from 00.01 hours of 24th April 2021 to 24-00 hours on 23rd May 2021.

(1) Carrying of arms, cudgels, swords, spears, bludgeons, unlicensed guns, knives, sticks or lathis or any other articles which are capable of being used for causing physical harm (violence) save for such firearms where license has been granted by this authority or where specific permission is sought for carriage of such arms from the competent authority.

(2) The carrying of any corrosive substance or explosive.

(3) The carrying, collection and preparation of stones or other missiles or instruments or means of casting or impelling missile.

(4) The exhibition of persons or corpses or figures or effigies thereof.

(5) The public utterance of cries, singing of songs, playing of music.

(6) Delivery of harangues, use of gestures or mimetic, representations and the preparations, exhibition or dissemination of pictures, symbols, placards or any other object or thing which may in the opinion of any police officer posted in Brihan Mumbai City, offend against decency or morality or undermine the security of or tend to over-throw the state.

2. If any person goes armed with such article or carries any corrosive substance or explosive or missile in contravention of such prohibition, he/she shall be liable to be disarmed of the corrosive substance or explosive or missile and it shall be liable to be seized from him/her by any police officer and the article, corrosive substance, explosive or missile so seized shall be forfeited to the State Government.

3. This order will not be applicable to any person being in service or employment of any Government or Government Undertaking required by his superiors or by the nature of his duties, to carry weapons. The order will also not be applicable to Private Security Guards or Gurkhas or Chowkidars etc., employed on watch-n-ward duties carrying lathis admeasuring in length not exceeding 3½ feet.

4. Notwithstanding the expiration of this order after the period hereinabove mentioned,

(*a*) Any investigation or legal proceedings may be instituted, continued or enforced.

(*b*) Any penalty, forfeiture or punishments incurred in respect of any contravention of this order may be imposed, as if this order had not expired.

5. I, further direct that this order shall be published and promulgated in Brihanmumbai by affixing copies thereof in conspicuous public places and by announcing the same through loudspekers or megaphones, as well as publishing through media of whatever form available.

Given under my hand and seal on this 20th day of the April 2021 at Mumbai.

Greater Mumbai.

CHAITANYA. S.,
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

Order

No. CP/XI(6)/144/(Prohibitory Order)/2021.— WHEREAS, in exercise of powers, conferred under section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of the National Disaster Management Act, 2005, the Government of Maharashtra, issued directions *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, dated 21st April, 2021 (" **Break The Chain** ") to take certain emergency measures to prevent and contain the spread of COVID-19 virus, and to enforce these measures throughout the state from 8-00 P.M. on 22nd April, 2021 till 7-00 A.M. on 1st May, 2021.

2. Whereas, the undersigned issued an order u/s. 144 CRPC, dated 14th April 2021, to observe the directions of the Government of Maharashtra *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, dated 13th April 2021, to take certain measures to prevent and contain the spread of COVID-19 virus.

3. THEREFORE, I, Chaitanya. S., Dy. Commissioner of Police (Operations), Greater Mumbai, and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me u/sec. 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) r/w. the order of Commissioner of Police, Greater Mumbai, dated 23rd December 1959 u/s. 10 sub-section (*2*) of the Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951), with a view to prevent danger to human life, health or safety, do hereby, promulgate an order under section 144 CrPC, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, to observe the directions of the Government of Maharashtra *vide* Notification No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated : 21st April, 2021, placing certain restrictions regarding Office Attendance, Marriage Ceremony, Private Passenger Transport, Public Passenger Transport and prohibit violation of the same. All other conditions other than the ones specified in this Notification will be in accordance with the Notification dated 13th April 2021 and additions/clarifications already issued thereof by the State Government from time to time.

4. The Divisional ACsP, Zonal DCsP and Regional Addl. CsP in emergent/special cases are empowered to grant exemption/permission.

5. This order shall come into force, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, with effect from 8-00 P.M. on 22nd April 2021 and will remain in force till 7-00 A.M. on 1st May, 2021, unless withdrawn earlier.

6. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code 1860 in addition to penal provisions under the Epidemic Diseases Act, 1897 and National Disaster Management Act, 2005 and other legal provisions as applicable.

7. As the notice cannot be served individually on all concerned, the order is hereby passed *ex-parte*. It shall be published for the information of the Public, through the Press, or by affixing copies on the Notice Boards of the Police Stations and Offices of the Divisional ACsP and Zonal DCsP.

Given under my hand and seal on this 22nd day of the April 2021 at Mumbai.

CHAITANYA. S.,

Greater Mumbai.

Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ पोट-कलम (१) व (३) अन्वये मनाई आदेश

क्रमांक पो.उप.आ.मुख्या./मनाई आदेश/१७६१/२०२१.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच दिनांक २७ एप्रिल २०२१ रोजी हनुमान जयंती, दिनांक १ मे २०२१ रोजी महाराष्ट्र दिन /कामगार दिन, दिनांक ९ मे २०२१ रोजी शब-ए-कद्र असे सण सर्वत्र साजरे होणार आहेत.

ज्याअर्थी, मी विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालयाकडील क्रमांक पो.आ.वा./अधि.प्रधान/आदेश/३०/२०२०, दिनांक ९ नोव्हेंबर २०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) चे वापरावयाचे अधिकार आम्हास प्रदान करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरारोड, काशिमिरा, नवघर, नयानगर, भाईंदर, उत्तन, वसई, माणिकपुर, वालीव, नालासोपारा, तुळींज, विरार व अर्नाळा असे एकुण १३ पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाज-कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे.

त्याअर्थी वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी विजयकांत सागर पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) अन्वये जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालीलप्रमाणे मनाई आदेश देत आहे :—

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगणे.

२. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

३. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

४. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

५. सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजवणे.

६. सभ्यता अगर निती याविरुद्ध असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे.

७. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू राहणार नाही :—

" जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे. "

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागु राहणार नाहीत :—

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय,

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश, दिनांक २७ एप्रिल २०२१ रोजी ००-०१ वाजे पासून ते दिनांक ११ मे २०२१ रोजीचे २४-०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

विजयकांत सागर,
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.

ठाणे,
दिनांक २६ एप्रिल २०२१.

OFFICE OF THE COMMISSIONER OF POLICE, RAILWAYS MUMBAI

Order

No. CP/RLY/MUMBAI/PREVENTION U/S 33 r/w 43 M.P. ACT, 1951.— WHEREAS, Government of Maharashtra has issued restrictions order *vide* notification No. DMU/2020/CR.92/ DisM-1, dated 29th April, 2021 ("Break the Chain") hereinafter called the order and whereas it has been reported that large no. of people are gathering at various railway stations for the purpose of commute and other activities and whereas many of them are not confirming to the COVID-19 appropriate behavior as specified in the order creating grave risk and dangerous to fellow passengers and

WHEREAS it is necessary and expedient for the purpose to enforce the guideline efficiently I, **Quaiser Khalid**, Commissioner of Police, Railways, Mumbai in exercise of the power conferred upon me under sub section (*1*)(*b*) of section 33 and section 43 (*1*) and (*2*) of Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951) do hereby delegate and authorize the above said powers to all officers up to the rank of Police Sub Inspector under Mumbai Railway Commissionerate. All such empowered officers are directed to take necessary action against people not adhering to the directives contained in the order for the period from 00-01 hours of 1st May 2021 24-00 hrs. of 15th May 2021.

Officers so authorized shall follow the procedure laid for the purpose of the offenders.

1. Due to Covid-19 pandemic, so as to prevent danger any person using public place without wearing mask in Mumbai Railway Police Commissionerate jurisdiction.

2. Notwithstanding the expiration of this order after the period herein above mentioned.

(*a*) Any investigation or legal proceeding may be instituted, continued or enforced.

(*b*) Any penalty, forfeiture or punishments incurred in respect of any contravention of this order may be imposed, as if this order had not expired.

3. I further direct that this order shall be published and promulgated in Mumbai Railway Police Commissionerate by affixing copies thereof in conspicuous public places and by announcing the same through Railway announcement system, loudspeakers or megaphone, as well as publishing through media.

Given under my hand and seal this 30th April 2021.

Mumbai.

QUAISER KHALID,
Commissioner of Police,
Railways, Mumbai.

पोलीस उप आयुक्त परि-३ मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांजकडून

मनाई आदेश

क्रमांक पो.उ.आ. परि. ३. मि.भा.व.वि./वैतरणा रेल्वे ब्रिज/मनाई आदेश/१५२१/२०२१.— ज्याअर्थी, उपोद्‌घातातील अनुक्रमांक ५ मध्ये अंतर्भूत असलेल्या पत्रान्वये मुख्य ब्रिज अभियंता, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई यांनी असे निर्दशनास आणून दिले आहे की, मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाणे अंतर्गत रेल्वे ब्रिज क्रमांक ९२ येत असून त्याच्या पोहोच मार्गामधील रेती उत्खनन व नौकानयन मार्ग वाहतूकीसाठी बंद करणे आवश्यक आहे.

२. ज्याअर्थी, भारतीय रेल्वे कायदा, १९८९ चे कलम २० मध्ये Not with standing anything contained in any other law, the central Government may, if it is of the opinion that any work undertaken or may be undertaken, is likely to alter or impede the natural course of water flow or cause an increase in the volume of such flow endeangering any cutting, embankment or other work on a railway, issue directions in writing to any person, officer or authority responsible for such work to close, regulate or prohibit that work, अशी तरतूद केली आहे.

३. ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ली आणि मार्ग, पूल, खंदक, धरणे आणि त्याच्या वरील किंवा त्यांचे बाजूची कुंपणे आणि पूर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदरांचा व खाड्यांचा आणि नद्या, ओहोळ, नाले, सरोवर, तळी यांचा तळ आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि साचलेले सर्व पाणी व वाहते पाणी इत्यादी वर राज्य शासनाचा मालकी हक्क आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख/दि. १२/०३/२०१३ व शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दि. २१/०५/२०१५. अन्वये पुलाचे दोन्ही बाजूस ६०० मीटर (२००० फूट) च्या क्षेत्रात रेती उत्खननास परवानगी देण्यात येत नाही.

४. ज्याअर्थी, मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक २७/२०११ दिनांक ०३/१०/२०११ अन्वये च्या आदेशान्वये रेल्वे क्रमांक ९२ च्या क्षेत्रातील रोडचा वापर रेती वाहतूक ट्रकसाठी प्रतिबंधित केला आहे.

५. ज्याअर्थी, फौजदारी दंडप्रकिया संहिता १९७३ चे कलम १४४(१) अन्वये उपद्रवाच्या किंवा आशंकित संकटाच्या अशा तातडीच्या प्रकरणात आदेश काढण्याच्या प्राप्त अधिकारान्वये या कलमाखाली कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तात्काळ प्रतिबंध करणे किंवा सत्वर उपाययोजना करणे इष्ट असेल त्या प्रकरणी एखाद्या व्यक्तीला विवक्षीत कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा तिच्या कब्जातील किंवा तिच्या व्यवस्थापना खालील विवक्षीत मालमत्तेबाबत बंदोबस्त करण्याचा निर्देश दिल्यास कायदेशीरपणे नेमलेल्या व्यक्तीस अडथळा, त्रास, क्षती पोहचवण्यास अथवा मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अपकारक आहे असे दंडाधिकाऱ्याला वाटले तर असा दंडाधिकारी प्रकरणपरत्वे महत्त्वाच्या तथ्यांचे निवेदन अंतर्भूत असलेल्या आदेशाद्वारे निर्देश देऊ शकेल.

६. त्याअर्थी, मी प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त विरार परिमंडळ-३, मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१),(३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रातील वैतरणा नदीवरील रेल्वे पूल क्रमांक ९२ च्या दोन्ही बाजूस ६०० मीटरच्या परीसरात दिनांक ६ मे २०२१ रोजी चे ००-०१ वाजेपासून ते ३ जुलै २०२१ रोजी चे २४-०० वाजेपर्यंतच्या कालावधीत पोलीस विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, भारतीय नौदल, कोस्टगार्ड, मत्स्यव्यवसाय, उत्पादन शुल्क विभाग, वन विभाग इत्यादी शासकीय विभाग वगळून इतर सर्व व्यक्तींना वैतरणा नदीवरील रेल्वे ब्रिज क्रमांक ९२ च्या दोन्ही बाजूस ६०० मीटर अंतरात मा. पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर-वसई-विरार यांचे पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारच्या नौकानयन मार्गाचा वापर करण्यास मनाई आदेश लागू करीत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ४ मे २०२१ रोजी दिलेला आहे.

प्रशांत वाघुंडे,
पोलीस उप आयुक्त, विरार परिमंडळ-३,
मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक राअ/२१४१/२०२१.— श्री. एल. जी. पाच्छे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर अलिबाग, यांची जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग अधिसूचना क्रमांक रा.अ. २२०९/२०२१, दिनांक ९ एप्रिल २०२१ अन्वये मंजूर झालेली दिनांक १९ एप्रिल २०२१ ते २३ एप्रिल २०२१ अशी ५ दिवसांची अर्जित रजा, याद्वारे रद्द करणेत येत आहे.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक १९ एप्रिल २०२१.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड यांजकडून

अधिसूचना

क्रमांक आरजीडी/अेबीजी/एचएसजी (टिसी)/४६३५/२०२१.—सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड जाहीर करतात की, शिव महिमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., विद्यानगर पूर्व-चेंढरे (सर्व्हे नं. ६०/१ प्लॉट क्र. ६) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) चे कलम ९(१) अन्वये नोंदण्यांत आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकार संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

अशोक धों. मोरे,
रायगड, सहायक निबंधक,
दिनांक २४ मार्च २०२१. सहकारी संस्था, अलिबाग-रायगड.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड यांजकडून

अधिसूचना

क्रमांक आरजीडी/अेबीजी/एचएसजी (टिसी)/४६३४/२०२१.—सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड जाहीर करतात की, सुखदा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., विद्यानगर-चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड (सर्व्हे नं. २४ हि. नं. २ अ प्लॉट नं. ६, रॉयल मोटार ट्रेनिंग स्कूलच्या मागे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) चे कलम ९(१) अन्वये नोंदण्यांत आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकार संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

अशोक धों. मोरे,
रायगड, सहायक निबंधक,
दिनांक १२ मार्च २०२१. सहकारी संस्था, अलिबाग-रायगड.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड यांजकडून

अधिसूचना

क्रमांक आरजीडी/अेबीजी/एचएसजी (टिसी)/४६३१/२०२१.—सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड जाहीर करतात की, सोमनाथ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., रेवदंडा (रेवदंडा बाजारपेठ, सर्व्हे नं. १३७३) ता. अलिबाग, जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) चे कलम ९(१) अन्वये नोंदण्यांत आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकार संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

अशोक धों. मोरे,
रायगड, सहायक निबंधक,
दिनांक २२ जानेवारी २०२१. सहकारी संस्था, अलिबाग-रायगड.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड यांजकडून

अधिसूचना

क्रमांक आरजीडी/अेबीजी/एचएसजी (टिसी)/४४८०/२०२१.—सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग-रायगड जाहीर करतात की, वक्रतुंड रेसिडेंन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., रेवदंडा (बँक ऑफ इंडिया रेवदंडा शाखेजवळ) (सर्व्हे नं. १०४/२अ/२) ता. अलिबाग, जि. रायगड. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) चे कलम ९(१) अन्वये नोंदण्यांत आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये महाराष्ट्र सहकार संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे आहे.

अशोक धों. मोरे,
रायगड, सहायक निबंधक,
दिनांक २० जानेवारी २०२१. सहकारी संस्था, अलिबाग-रायगड.

उप निबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई यांजकडून

नोंदणीची अधिसूचना

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूएम/जीएनएल/ओ/११७३०/२०२१-२२/सन २०२१/९९४.— उप निबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, जान्हवी सेवा सहकारी संस्था मर्या., प्लॉट नं. १८९/ए, लिम्बोनी बाग, गोवंडी, मुंबई ४०० ०४३, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा अधिनियम क्र. २४) यांच्या कलम ९(१) उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " सर्वसाधारण संस्था " असून उप वर्गीकरण " इतर संस्था " असे करण्यात आले आहे.

डॉ. ज्ञानेश्वर डोंगरे,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक ८ एप्रिल २०२१. सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई.

उप निबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई यांजकडून

नोंदणीची अधिसूचना

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूएम/जीएनएल/ओ/११७२९/२०२१-२२/सन २०२१/९९६.— उप निबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, मुक्ताई महिला सेवा सहकारी संस्था मर्या., बी-६०२, ४ए, बी-बिंग, चेंबूर, ट्रेडिंग कार्पो., राहूलनगर, आणिक व्हिलेज, वाशीनाका, चेंबूर, मुंबई ४०० ०७१, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे (सन १९६१ चा अधिनियम क्र. २४) यांच्या कलम ९(१) उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " सर्वसाधारण संस्था " असून उप वर्गीकरण " इतर संस्था " असे करण्यात आले आहे.

डॉ. ज्ञानेश्वर डोंगरे,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक ८ एप्रिल २०२१. सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ यांजकडून

आदेश

क्रमांक सनिकु/अ/नक्षत्र नगरी/ज्ञापन/९८३/२०२१.— या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येते की, नक्षत्र नगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग संस्था नोंदणी क्रमांक एसडीजी/केडीएल/एचएसजी/ओएच/५६५/२०२१, दिनांक ८ एप्रिल २०२१, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २४) कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपनिर्दिष्ट अधिनियम क्रमांक कलम १२ (१) अन्वये व महाराष्ट्र सहकार संस्था नियम, १०(१) ५(ब) अन्वये संस्थेचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " इतर गृहनिर्माण संस्था " असे आहे.

के. आर. धुळप,

कुडाळ, सहायक निबंधक,

दिनांक ८ एप्रिल २०२१. सहकारी संस्था, कुडाळ, सिंधुदुर्ग.

उप निबंधक, सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई यांजकडून

नोंदणीची अधिसूचना

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूके-डब्ल्यु/एचएसजी/टिसी/१६२७८/२०२०-२१/सन २०२१/५१२.— उप निबंधक, सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, दिव्यम हाईटस, बी-२, को-ऑप हौसिंग सोसायटी लि., सीटीएस नं.-२५०/सी, ऑफ अंधेरी व्हिलेज, गिलबर्ट हिल जवळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नियम, १९६१ चा अधिनियम क्रमांक (२४) (९) (१) अन्वये नोंदणीकरिता आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडे सहभागीदारी संस्था " असे करण्यात आले आहे.

नितीन दहिभाते,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक ३ मार्च २०२१. सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई.

उप निबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांजकडून

नोंदणीची अधिसूचना

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूके-डब्ल्यु/एचएसजी/टीसी/१६२८१/२०२१-२२/सन २०२१/९५५.— उप निबंधक, सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, प्लॅटिनम रेसिडेन्सी को-ऑप हौसिंग सोसायटी लि., सर्वे नं. ४, हिस्सा नं.-२, (पैकी) सर्वे नं-५, व सर्वे नं.-८, हिस्सा नं.-३ पैकी, सर्वे नं.-१५, ५, आणि सीटीएस नं.-५०२/३, वैशाली नगर, सेक्टर ए, मुखी सद्रुददीन वली, प्रस्लामार्ग, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई ४०० १०२, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नियम, १९६१ चा अधिनियम क्रमांक (२४) (९) (१) अन्वये नोंदणीकरिता आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी संस्था ” असे करण्यात आले आहे.

नितीन दहिभाते,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक १२ एप्रिल २०२०. सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई.

उप निबंधक, सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई यांजकडून

नोंदणीची अधिसूचना

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूके-डब्ल्यु/एचएसजी/टीसी/१६२७९/२०२०-२१/सन २०२१/५४९.— उप निबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, चित्रलेखा हेरीटेज को-ऑप हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. ए-१, सी.टी.एस. नं. ६९०ए, ओशिवरा, ऑफ विरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक (२४) (९) (१) अन्वये नोंदणीकरिता आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था ” असे करण्यात आले आहे.

नितीन दहिभाते,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक ९ मार्च २०२०. सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई.

उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उपनि/ससं/मुंशुपुउकोमं/बी-१/२९९/२०२१.— याद्वारे अधिसूचित करीत आहे की, कबिराश्रम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं. ९ ते ९ ई, पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३, नोंदणी क्रमांक एमयुएम/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/९६/२०२१-२०२२ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमंक २४) यांचा कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था ” असे करण्यात आले आहे.

डॉ. प्रशांत सोनवणे,

मुंबई, उप निबंधक,

दिनांक १७ फेब्रुवारी २०२०. सहकारी संस्था, मुंबई शहर,

पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र,

कोकण गृहनिर्माण व

क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.